# घराकडे
## अपुल्या...

दोन अंकी स्वतंत्र नाटक
लेखक : प्रल्हाद जाधव

पात्रे :
विक्रम (३०)
शर्वरी (२८)
शिवा (६०)
पार्वती (५५)
बाज्या (७०)
गंगी (६५)

अंक पहिला / प्रवेश पहिला

(पडदा उघडतो. मोटरसायकल थांबल्याचा आवाज. प्रकाश. प्रेक्षक आणि रंगमंच यामध्ये एक छोटी वाहती नदी आहे अशी कल्पना. पलीकडे किनाऱ्यावर बसता-फिरता येईल अशी जागा. मागे डोंगर. त्यामागे आकाशपडदा. थोडे आकाश दिसत आहे. रंगमंचावर येताना एका दगडावरून उडी मारूनच यावे लागते. डोंगराच्या पायथ्याशी प्रेक्षकांच्या उजव्या हाताला विंगेच्या आत शिवा बांदल याचे घर.

विक्रम (३०) आणि शर्वरी (२८) येतात. शर्वरी-देखणी, बुद्धिमान. मुंबईत 'थ्री-डी' ही स्वतःची कंपनी चालवते. विक्रम- हॅण्डसम, हुषार. स्वीडनमध्ये डब्ल्यू. एम.जी. या कंपनीत एच. आर. मॅनेजर.पॅन्ट, टी- शर्ट, जॅकेट असा वेष. शर्वरी थोड्याफार फरकाने तशाच वेषात. ट्रेकिंग शूज, कॅप, विण्डचीटर, सॅक... असा जामानिमा. साईड-बॅगेत मोबाईल. सॅकमध्ये लॅपटॉप, पाण्याची बाटली, दुर्बिण असे साहित्य)

शर्वरी : (उडी मारून पलिकडे जाते आणि विक्रमला तिकडून हात देत) या इथे पाय ठेव दगडावर... सावकाश, शेवाळ माजलंय, सावकाश, अश्शी ऽऽऽ हं चल... गणपती बाप्पा ऽऽ ( तो 'मोरया ऽऽऽ' असं म्हणत उडी मारतो आणि थेट पलिकडचा काठावर धडपडत आडवा होतो.) अरे हो हो, दमानं... लागलं नाही ना कुठं?
विक्रम : नाही नाही, नो प्रॉब्लेम, आय विल मॅनेज. हा एवढा मोठा किल्ला चढून जायचंय... पहिल्याच बॉलला आऊट होऊन कसं चालेल?
शर्वरी : व्हेरी गुड! दॅट्स द स्पिरीट!
विक्रम : (वर पहात) वाटलं नव्हतं एवढा मोठा असेल किल्ला म्हणून!
शर्वरी : दिसतं तसं नसतं बऱ्याचदा!
विक्रम : ते ठीक आहे पण दुरून डोंगर साजरे असं म्हणायची वेळ येऊ नये म्हणजे झालं. संध्याकाळी पोचायचंय परत मुंबईत, म्हणजे चार वाजता तरी उतरायला सुरुवात करावी लागेल.
शर्वरी : (पहात) एखादा गाईड मिळाला असता तर बरं झालं असतं.
विक्रम : इथं गाईड्स मिळतात असं म्हटलंय त्या वेबसाईटवर. (मोबाईल पहात) चेक करू का पुन्हा एकदा?
शर्वरी : कोणीतरी दिसतंय तिकडं, गुराखी आहे वाटतं. (टाळ्या वाजवत) शुक शुक्...काका, अहो काका ऽऽऽ
शिवा : (आतूनच) मला म्हणताय का?
शर्वरी : हो, प्लीज येताय का जरा?
शिवा : आलू आलू ऽऽऽ ( शिवा येतो. शिवा बांदल. साठीत असला तरी पन्नाशीतील भासणारा. सुदृढ, प्रसन्न-बुद्धिमान व्यक्तीमत्व. धोतर, बंडी, डोक्याला मुंडासे. हातात काठी, खांद्यावर घोंगडीची खोळ)
शिवा : रामराम ताई!

शर्वरी : नमस्कार!
शिवा : बोला? कशापाय बलिवलं?
विक्रम : गडावर चाललोय. रस्ता माहीत नाही… गाईड मिळेल का इथं एखादा?
शिवा : आता एवढ्या उशिरा कुठला गाईड? सकाळ झाली की जो तो लागला आपल्या कामाला...
विक्रम : मग तुम्ही येता का आमच्यासोबत?
शिवा : म्या आलू अस्तू पर घराकडं बघाया कोण न्हाई... माघारीण गेलीय बिरवाडीला आणि पोरगं - नाम्या, गेलाय महाडला. गुराढोरांकडं बघायापण कोण न्हाई…
विक्रम : रिक्वेस्ट होती, बघा जरा जमलं तर...
शिवा : माझं ऐकाल तर घरी जावा परत. पावसानं दैना झालीय सगळी...दरडी कोसळायचीपण शक्यता हाय.
शर्वरी : खूप लांबनं आलोय, परत कधी जमणार काका?
शिवा : आन रस्ता चुकला, पाय घसरून पडलात, काय भानगड झाली तर निस्तरणार कोण? वरनं सरळ या 'काळ-ढवात' पडाल. हाडपण गावायचं न्हाय.
विक्रम : (शर्वरीकडे रोखून पहात) तरी मला शंका होतीच.
विक्रम : (हस्तक्षेप करीत) तेवढं कळतं हो, इतके काही लहान नाही आम्ही.
शिवा : आसं आसंल तर तुमची मर्जी. ही पायवाट धरून असं वळत वळत वर जायाचं.चार घंट्यात पोचाल. ही वाट सोडायची नाय म्हजी झालं!
शर्वरी : पण तुम्ही चला की सोबत. एवढं काय त्यात? चुकलो तर वाट लागायची आमची!
शिवा : आत्ताच धा-बारा पोरांची एक टोळी गेलीय पुढं, त्यांचा अंदाज घेत मागं मागं जावा त्यांच्या…
विक्रम : लांब गेले असतील हो ते एवढ्यात, आम्हाला नाही सापडले तर?
शिवा : म्हणून म्हणतूय - शहाणं असाल तर इथनंच नमस्कार करा उमाईला आन फिरा माघारी, एवढं काय करणार वर जाऊन?
विक्रम : गड बघितल्याचं समाधान, दुसरं काय?
शिवा : हो पण पावसा-पाण्याच्या दिसातच का यावंसं वाटलं? पत्त्या कुणी दिला हितला?
विक्रम : गुगलवर सर्च केलं, 'फोर्ट्स ऑफ महाराष्ट्रा' त्यात भैरवगड दिसला.मुंबईवरनं माणगावपर्यंत येणारच होतो, म्हटलं यावं जाऊन...मॅप डाऊनलोड करून आलो...
शर्वरी : कारवीपण बघायची होती फुललेली…
शिवा : हे कारवीचं कुणी सांगिटलं तुमास्नी?
शर्वरी : गुगलवर मिळते सर्व माहिती. नवं तंत्रज्ञान आहे ते.
शिवा : आपल्याला काय जमत न्हाय बाबा ते!
विक्रम : पुढं जायचं तर शिकावं लागतं त्यासाठी.
शिवा : खरं सांगायचं तर आमची पिढी मोडीत निघाली हेच खरं… आमचं पोरगं, नाम्या-त्ये मातर मोबाईलवर नायतं काम्पुटरवर बसून बटनं दाबत बसतंय सारखं, पण ध्यानात येत नाही आमच्या कायबी.
विक्रम : चला सोबत, काय फी असेल ती देऊ तुमची.
शिवा : पैशाचं काय नाय एवढं पण एकदा का चढाईला सुरूवात केली की उमाईच्या पायावर डोकं ठेवल्याशिवाय मागं फिरता येणार नाही. आताच इचार करा. चार तास जायाला, दोन येयाला?
विक्रम : (मोबाईलवर वेळ पहात) सहापर्यंत खाली परत आलो म्हणजे झालं...मग इथनं पुढं मोटरसायकल आहे!
शर्वरी : हो, अगदी बरोबर!
(गायीच्या हंबरण्याचा आवाज येतो)
शिवा : मं थांबा वाईच, चांदीला बांधून येतो ...
विक्रम : चांदी?
शिवा : गाय हो आमची.
विक्रम : असं होय?

शिवा : (पुन्हा हंबरण्याचा आवाज) चल ग ए, हेऽऽ हैक, हैऽऽक. व्हय म्होरं! पारी आल्यावर घालील तुला पेंडी. (मध्येच वाघ्या भुंकतो.) चल ए वाघ्या, आता तू लाडात येऊ नग. व्हय म्होरं, चल! (त्या दोघांना) मुका प्राणी हाय पर लय माया त्याची माझ्यावर,आलो म्या... (विंगेतील घराकडे निघून जातो)
विक्रम : (त्याचा फोन वाजतो. फोन पहात) चॅयला, स्वीडनवरनं हॅरीचा फोन!(चिंतीत) काय सांगू त्याला आता?
शर्वरी : सांग तुला जे योग्य वाटेल ते!
विक्रम : (क्षणभर विचार करून फोन घेतो) हॅलो हॅरी, हौ आर यू? ग्रेट. आय ॲम फाईन. हौ इज ज्यो? स्टिल गोइंग स्ट्राँग! (हसत) आय नो, आय नो. ग्रेट. येस, येस. थँक्यू. थँक्यू. शर्वरी? शी इज फाईन, एव्हरीथिंग इज इन कंट्रोल नाऊ. डोन्ट वरी. या या,ओके, ओके. येस आय विल बी बॅक इन फोर-फाईव्ह डेज् बट गिव्ह मी सम टाईम टू थिंक…आय सी, ओके, ओके. थॅन्क्यू ...बाऽऽय हॅरी! (फोन खिशात ठेवत) उद्यापर्यंत फायनल डिसीजन कळवायचा आहे, नाहीतर नवीन माणूस घेतो म्हणाला!
शर्वरी : (विचारमग्न)
विक्रम : आणि त्याचं तरी काय चुकतंय मला सांग!आठ दिवसांसाठी आलो मी इथं पण पंधरा दिवस झाले आता...
शर्वरी : टाईम-टेबल थोडं माग पुढे झालं आपलं त्याला मी तरी काय करणार? तू ठरव काय ते!
विक्रम : काय ठरवू? एवढी चांगली नोकरी मिळणार आहे का मला इथं? त्यात प्रमोशन ड्यू आहे लवकरच... तू चल बरोबर, तर ते पटत नाही तुला. तुझ्या कंपनीची शाखा तिकडंपण सुरू करू शकतो आपण! (शांतता) संधी पुन्हा पुन्हा मिळत नाही हे लक्षात घे शरे!
शर्वरी : फ्रॅंकली स्पीकिंग, इथं बाबांना असं एकटं सोडून मी नाही येऊ शकत इतक्या लांब.
विक्रम : त्यांनापण बरोबर घेऊन जाऊ की!
शर्वरी : नको,नको! त्यांना नाही मानवणार तिकडचं हवामान. शिवाय अशा डेलिकेट परिस्थितीत न्यायचं त्यांना म्हणजे अवघडच होणार सगळं...
विक्रम : तुझीच यायची इच्छा दिसत नाही! (खोचकपणे) दुसरा कोणी बघून ठेवला नाहीस ना इकडं एखादा?
शर्वरी : कमॉन! तूच बघून ठेवली असशील एखादी तिकडं!
विक्रम : मूड खराब नको करू सकाळी सकाळी!
शर्वरी : मी कुठं करतेय, तूच शिरतोयस वाकड्यात. तुला माहितायना कशासाठी आलोय आपण इथं ते? (क्षणभर शांतता) जाऊया का का परत?
विक्रम : ओके ओके! सॉरी सॉरी! थोडी गंमत करत होतो...
शिवा : (एक मोठं बोचकं घेऊन येतो. हातात काठी. काठीच्या वरच्या टोकाला लोखंडी फाळ.) चला पोरांनो!
विक्रम : तुमचं नाव काय काका, विचारलंच नाही आम्ही.
शिवा : शिवा बांदल! गावात समदे शिवाच म्हनत्यात मला. तुमीबी म्हना शिवा, 'शिव्या' म्हनलं तरी चालेल. (हसतो)
शर्वरी : छे छे, असं कसं? वयाचा तरी मान ठेवला पाहिजे की नाही आम्ही?
शिवा : त्यात काय एवढं? लाडात आली की आमची पारीसुदिक शिव्या म्हनती मला.
शर्वरी : पारी?
शिवा : बायको माझी. पार्वती हो! बिरवाडीला गेलीय दूध घालाया. येईल दुपारपतूर.
शर्वरी : दूध घालता का तुम्ही लोकांना?
शिवा : व्हय तर? दूध, दही, तूप, खवा, भाजीपाला समदं इकतो आमी थोडं थोडं. पोटापाण्याला पायजे ना कायतरी! अडीनडीला मोफत देतो गरजू माणसाला.
विक्रम : मुलगा काय करतो तुमचा?
शिवा : दहावीत हाय आता, पर साळा सोडून शेतीभातीच्या कामातच लय इंट्रेस हाय बघा त्याला.
शर्वरी : आय सी!
शिवा : 'काळभाता'चं बियाणं घेऊन महाडला गेलाय...कृषी प्रदर्शन भरलंय तिकडं.
विक्रम : काळभात?
शिवा : भाताची जुनी जात हाय ती! कितीबी खाल्ला तरी, डायबिटीस न्हाय का काय नाय…
शर्वरी : अरे व्वा!

शिवा : आपली सगळी कडधान्य, भाजीपाला, पपई - कलिंगडाच्या जाती; सगळं हायब्रिड बियाणांनी मारून टाकलं चॅयला...म्हणून जुनी बियाणी जपून ठिवतो आमी. एखादा शहाणा माणूस भेटला तर देतो त्याला.
विक्रम : जमाना बदललाय काका, काळाबरोबर बदलावं लागतं...
शिवा : पर इतकंपण बदलणं बरं न्हाय की मूळची वळंखच पुसून जाईल आपली! (संगीत) समदा कस जात चाललाय आविष्याचा हेच खरं!
शर्वरी : (क्षणभर विचार करत) चलू या आता नाहीतर इथंच वेळ जायचा बोलता बोलता.
शिवा : हो चला, चला!
शर्वरी : थॅन्क्स, तुम्ही वेळ काढलात आमच्यासाठी...
शिवा : त्यात काय एवढं, तसंपण गडावर जायाला कायम खुश असतो म्या. गाईड म्हणूनपण काम करतो का न्हाय कवा कवा? चला, पाऊस आला तं फजिती व्हईल चांगली!
विक्रम : (सॅक पाठीला लावत) चला!
शिवा : छत्री-विंडचिटर कायतरी आणलं आसंल ना सोबत?
विक्रम : हो हो, विंडचीटर घेतलंय ना!
शिवा : शाब्बास! (समजावून सांगत ) हे बघा, आपण जिथं उभं आहोत ती ही झिपरी नदी. तिचं पाणी वरनं बघितलं तर एखाद्या बाईनं मोकळ्या सोडलेल्या  झिपऱ्यागत दिसतं, म्हणून तिचं नाव झिपरी…
शर्वरी : वाव्व ऽऽऽ
शिवा : हा इकडं काळ-ढव. त्याच्या खोलीचा अंत लागत न्हाय बघा. कितीबी दुष्काळ पडला तरी पाणी आटत न्हाय त्याचं. बालेकिल्ल्यावरनं एखादा दगड फेकला तर तो डायरेक्ट ढवातच पडतोय ह्या! (वर हात करत) ही तटबंदी, वर चोरदिंडी, उजव्या हाताला धाकला पाणवठा. पुढं वाघुळ-भुयार, तिथनं उभी चढाई, मग माकडखिंड,  कारवीचा माळ, बैरागीवड, येडीधोंड... थोडं वर गेलं की घोड्यांची पागा, नगारखाना, म्हाराजांचं स्मारक, उमाईचं मंदीर आन् बालेकिल्ला…
शर्वरी : ग्रेट!इट्स सो एक्सायटिंग!
शिवा : चलायचं?
दोघेही : हो हो, चला!
शिवा : थांबा वाईच! (बोचक्यातून रोप काढत) हे घ्या!
विक्रम : हे काय?
शिवा : झाडाचं रोप हाय... लावून घेतो तुमच्यासारखं कोण भेटलं तर. पुण्याचं काम हाय! झाडं लावली पाहिजेत आपण, सांभाळली पायजेत… महाराजांनी तरी दुसरं काय सांगितलंय?
शर्वरी : ओ ग्रेट!
शिवा : (फाळानं खड्डा खणत) नर्सरी हाय आमची छोटुशी. तिथं तयार करतो आमी रोपं...
शर्वरी : कसलं आहे हे रोप?
शिवा : वडाचं हाय. बोलता बोलता वाढतं बघा. डेरेदार रहातं वर्षभर. लालभडक टेंबरं येतात पानोपानी… लांबलांबनं पक्षी येतात ती खायाला. घरटी बांधतात. घनदाट सावली राहाती वर्षभर! प्राणी-पक्ष्यांना मोठा आधार होतोय त्याचा. हे घ्या! (विक्रम-शर्वरी ते घेत प्लास्टिकची पिशवी फाडून रोप बाहेर काढतात) पर हे लावताना कुणाचीतरी आठवण म्हणून लावायचं बरं का. मग कसं झपाट्यानं वाढतंय बघा ते. डोळे मिटा अन् तुमच्या आवडत्या माणसाची आठवण काढा...चला… (संगीत. शर्वरी रोप खड्ड्यात ठेवताना एकदम रडू लागते. शिवा गोंधळलेला.)
शिवा : काय म्हणावं ह्या कर्माला! काय चुकलं का माझं?
विक्रम : (शिवाला) नाही, नाही. तुमचं काही चुकलं नाही. (शर्वरीला थोपटत) शांत हो शर्वरी, शांत हो! (शिवाला) आई गेली तिची नुकतीच! पंधरा दिवस पण झाले नाहीत अजून... (संगीत)
शिवा : असं व्हय?
विक्रम : हो.
शिवा : आन मंग क्रियाकर्म?

विक्रम : कालच झालं ते मुंबईत...हिची आई मूळची माणगावची. तिची इच्छा होती की तिच्या अस्थींचं विसर्जन काळ नदीत करावं म्हणून! त्यासाठीच सकाळी लवकर निघालो मुंबईतनं. येतानाच ठरवलं होतं,इतक्या जवळ आलोय तर भैरवगड बघून जावं… मनपण हलकं होईल.
शिवा : असं व्हय? आलं ध्यानात! (शर्वरीला) हं घ्या आईचं नाव आणि लावा हितं...(लावतात. दोघेही त्यावर माती, पाणी घालतात.संगीत.) आंग आश्शी ऽऽऽ शाब्बास! आन् बरं का पोरी, …काय नाव तुझं?
शर्वरी : शर्वरी.
शिवा : वा झकास नाव हाय अगदी! (उच्चारण्याचा प्रयत्न करत) शर...शर... सावरी म्हनलं तर चालंल का?
शर्वरी : (खुद्कन हसत) हो, चालेल की!
शिवा : बरं... तर बरं का सावरीताई, दोन-तीन वर्षात कसं जोमानं वाढतंय बघा! आईच्या सगळ्या आठवणी फळाला येतील इथं, पाखरांची गर्दी व्हईल मायंदाळ!
शर्वरी : थॅंक्यू काका!
शिवा : अग मला कशाला थांकू म्हणती, निसर्गाचा नियमच हाय तो. एका हातानं काढून घेतो त्यो आन् दुसऱ्या हातानं पुन्हा वंजळीत टाकतो काहीतरी! मात्र तुमाला दरवर्षी एकदातरी यावं लागंल ह्याची वाढ बघायला, जमंल का ते?
शर्वरी : हो,अगदी नक्की!
शिवा : आपण लावलेलं झाड वाढताना बघण्यासारखा आनंद न्हाय दुसरा. (विक्रमला) आपलं नाव काय साहेब?
विक्रम : विक्रम.
शिवा : वि - क्र - म, जमलं ! वा, 'विक्रम आन् सावरी'! झ्याक जोडी हाय तुमची अगदी. तू काय कामधाम करतीस का न्हाय ग पोरी?
शर्वरी : कंपनी आहे मुंबईत आमची. 'थ्री डी' नावाची. तिघी पार्टनर आहोत आम्ही.
शिवा : काय नाव म्हणालीस कंपनीचं?
शर्वरी : ' थ्री डी ' ...' ड्रीम, डेअर ॲण्ड डी-कोड !'
शिवा : (हसत) पार डोक्यावरनं गेलं…
शर्वरी : सोप्या शब्दात सांगायचं तर महिलांच्या हक्काचं रक्षण करणं आणि त्यांना आधार देणं हे आमचं काम! कामकाजाच्या ठिकाणी पुरुषांनी महिलांशी कसं वागायचं हे पण शिकवतो आम्ही!
शिवा : (गोंधळातच) आणि तू काय करतोस रे पोरा?
विक्रम : ' वेलफेअर मिशनरीज ग्लोबल' म्हणून कंपनी आहे 'डब्ल्यू एम जी'... तिथं एच.आर. मॅनेजर म्हणून काम करतो. चॅरिटेबल संस्था आहे. चांगलं काम करणाऱ्यांना मदत करायची असं स्वरूप आहे कामाचं.
शिवा : वा, बेष्ट एकदम. चला, पण जरा एक मिनीट हं, प्रार्थना करूया या झाडासाठी ...
शर्वरी : प्रार्थना?
शिवा : एक झाड म्हजी एक अख्खं जगच आस्तंय पोरानो. किडामुंगी, फुलपाखरं, पक्षी अंगाखांद्यावर खेळतात त्याच्या. घरटी करतात, माणसाला ते फुलं देतं,फळं देतं, सावली देतं, प्राणवायू देतं. ते नष्ट झालं तर एक पूर्ण दुनियाच नाहिशी व्हतीया का न्हाय? लाखो रुपये खर्च केले तरी पुन्हा निर्माण न्हाय करता येत ती आपल्याला! मं प्रार्थना कराय नको त्याची?
दोघेही : हो, खरंय अगदी.
शिवा : (हात जोडून त्याची आवडती सर्वधर्म-प्रार्थना म्हणू लागतो. विक्रम-शर्वरी नकळत हात जोडत साथ देतात)
ॐ तत्सत श्रीनारायण तू, पुरुषोत्तम गुरु तू
सिद्ध बुद्ध तू, स्कन्द विनायक, सविता पावक तू
ब्रम्ह मज्द तू, यहव शक्ति तू, ईशू पिता प्रभु तू
रूद्र विष्णु तू, राम कृष्ण तू, रहीम ताओ तू
वासुदेव गौ, विश्वरूप तू, चिदानंद हरी तू
अद्वितीय तू, अकाल निर्भय आत्मलिंग शिव तू…
(नमस्कार करतो) चला!
विक्रम : आता तुम्ही ही प्रार्थना म्हटलीत ती -

शिवा : विनोबांची हाय ती! आमचे आजोबा वर्ध्याला गांधीजींच्या 'नई तालीम' शाळेत शिकले. तिथं रोज म्हणायची पद्धत होती. आमीपण हिकडं एखादं काम सुरू करताना आठवणीनं म्हणतो ती!
विक्रम : वा!
शिवा : परत जाताना गागोद्यावरनं जाल तुम्ही, विनोबांचं गाव! त्यांच्या स्मारकाला आठवणीनं भेट देऊन जा!
शर्वरी : हो हो,अगदी नक्की!
शिवा : चला! (तिघेही निघतात. पुढे शिवा.काखेत गाठोडे, हातात काठी. मधे शर्वरी, शेवटी विक्रम. एका क्षणी शर्वरी सर्वांना थांबवते. 'एक सेल्फी काढूया' असे म्हणत सेल्फी काढते आणि सारे चढू लागतात.)
शिवा : (पुन्हा थांबत) येक इच्यारू का?
विक्रम : काय?
शिवा : मुलांना नाय आणलं तुमी? लहानपणीच आवड लागली पाहिजे त्याना निसर्गात फिरायची.
विक्रम : लग्न झालं नाही अजून आमचं. (संगीत)
शिवा : ऑं?
विक्रम : हो!
शिवा : (गोंधळून) म्हजी कसं म्हणता?
विक्रम : मी राहतो तिकडं लांब परदेशात.
शिवा : परदेशात म्हजी नेमकं कुठं म्हणायचं ?
विक्रम : स्वीडनला...आहे का काही माहिती तिकडची?
शिवा : न्हाय बाबा, मुंबईच्या पलीकडं जग काय ते माहीत न्हाय आपल्याला.
विक्रम : माहीत नाही तेच बरं…आम्ही कसं जगतो ते कळायचं नाही तुम्हाला!
शिवा : मंग हिला घेऊन जावा की तिकडं मदतीला.
विक्रम : इतकं सोपं नाही ते. वड्लांना येथे ठेवून हिला भारत सोडता येत नाही आणि मला तिकडची नोकरी सोडून इकडे येता येत नाही!
शिवा : मं जमलं तरी कसं तुमचं?
विक्रम : लग्न जुळवणाऱ्या संस्थांची माहिती घेतली वेबसाईटवरनं... तिथंच जुळलं! फक्त मुहूर्त काढायचा बाकी राहिलाय. आई गेली हिची म्हणून थांबलोय थोडं...
शिवा : आई उमाईची इच्छा!तुमाला पटो न पटो तिच्या मनात आसंल तसंच व्हणार... चला!
विक्रम : चलो!
शिवा : वर गेल्यावर एक गंमत सांगतो बरं का पोरांनो!
शर्वरी : अय्या, कसली गंमत?
शिवा : आताच सांगिटली तर गंमत काय राहिली त्यात?
शर्वरी : तेही खरंच आहे तुमचं, चला!
शिवा : (प्रात्यक्षिक दाखवत) हे बघा, उभ्या चढणीची वाट सुरु झाली की पाऊल हे असं आडवं टाकायचं, हे बघा, असं आडवं, आलं ध्यानात?
विक्रम : आलं…
शिवा : आन् अगदी ल्हान ल्हान पावलं टाकत येका लयीत चालायचं, म्हजी दम लागत न्हाय…काय?
शर्वरी : हो हो आलं लक्षात, चला! (एकदम) अय्या ऽऽऽ
शिवा : काय झालं ग पोरी?
विक्रम : काय झालं शरे?
शर्वरी : अरे ते बघ फुलपाखरू! ते बघ...त्या पानावर बसून त्यावर साठलेलं पाणी कसं पितंय बघ मस्तपैकी!
विक्रम : कुठाय कुठाय, दाखव ना मला!
शर्वरी : अरे ते बघ तिकडे... ते ते,तिकडे! (विक्रम सॅकमधून दुर्बिण काढतो, डोळ्यांना लावून पाहतो)दिसलं?
विक्रम : हो हो दिसलं, पंख वर-खाली करत कसं पीतंय बघ! ओं व्वाव!
शर्वरी : एवढं जवळचं बघायलापण तुला दुर्बिण लावावी लागते तुला, कमाल आहे तुझी!

शिवा : (हसत) चला चला...इथं पावलोपावली अशा मायंदाळ गोष्टी दिसत राहत्याल तुमाला. गडावर आलं माणूस, की काय बघू नि काय नको असं व्हतं त्याला. चला चला, नायतर उशीर व्हईल हितंच! (निघतात...खळाळणारे पाणी, पक्ष्यांचा किलबिलाट, मंजुळ वारा असे संगीत. हळूहळू अंधार.)

अंक पहिला / प्रवेश दुसरा

(प्रकाश. किल्यावरील अधिक उंच भाग. रंगमंचाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत वरखाली वळणदार वाट. वाटेला लागून झाडाचा एक आडवा बुंधा. एकीकडे त्याला अडकून पडलेला मोठा दगड. बुंध्यावर बसता येते दगडालाही टेकून बोलता येते. दुसऱ्या टोकाला वर जाण्याची दिशा.आकाश अर्थात् मागचा पडदा आता अधिक दिसत आहे. दगडाच्या खालील बाजूने म्हणजे प्रेक्षकांच्या उजव्या बाजूच्या विंगेतील चढ चढून, उडी मारून शिवा वर येतो. बोचकं, काठी मोकळ्या जागेत ठेवून शर्वरीला हात देऊन वर घेतो. वर येताना तिची, 'ओ माय गॉड' अशी प्रतिक्रिया. पाठोपाठ तो विक्रमला वर घेतो. त्याचीही अशीच 'अरे बापरे, कठीण आहे परिस्थिती' अशी काहीशी प्रतिक्रिया.)
शिवा : दमला असशाल, टेका जरा वाईच!
शर्वरी : (विक्रमला) पाण्याची बाटली दे ती जरा. (तो देतो. ती बाटलीत तळाला पोचलेले पाणी घोट घोट घेऊ लागते.)
विक्रम : थोडं खाऊया काहीतरी.
शर्वरी : येस ऑफकोर्स! (शोधत एकदम) ओ माय गॉड!
विक्रम : काय ग, काय झालं?
शर्वरी : अरे खाऊची पिशवी आणलीच नाही आपण वर!
विक्रम : असं कसं होईल, माझ्या हातानं लावली होती मी ती मोटर-सायकलला!
शर्वरी : बरोबर आहे पण नदी क्रॉस करताना सॅकमध्ये टाकायची राहून गेली गडबडीत.
विक्रम : बोंबला तिच्यायला! अशी कशी ग मॅड तू? पिझ्झा, बर्गर, सॅन्डविच, बिस्किटं,चॉकलेट्स सगळं घेतलं होतं…
शर्वरी : सॉरी यार सॉरी, मी काही मुद्दाम नाही केलं ते!
विक्रम : शिट्! पाणीपण संपत आलंय, बाटली रिकामी झालीय. हॉटेल-बिटेल आहे का वर एखादं काका? पोटात कावळे कोकलायला लागलेत आतापास्नंच.
शिवा : हॉटेल कुठलं आलंय इथं, पडका किल्ला हा! ना त्यावर कधी लढाई झाली ना कुणी कारभार केला. सुफी संत, गोसावी-बैरागी काय राहून गेले तेवढेच. संतांच्या भजनांचा आवाज ऐकू येतो रात्रीबेरात्री तेवढंच!
शर्वरी : सरकारसुद्धा लक्ष घालत नाही का काही?
शिवा : सरकारचं काय सांगताय! उलट पायथ्याशी सॉ-मिल टाकायची परवानगी मिळालीय इथल्या आमदाराला ...
शर्वरी : ओ गॉड! सॉ-मिल हा कत्तलखानाच की झाडांचा!
शिवा : अगदी बरूबर!
शर्वरी : पण मग लोक काही विरोध नाही का करत?
शिवा : मांजराच्या गळ्यात घंटा बांधणार कोण?
विक्रम : अहो, रानात जी मॅच्युअर झालेली झाडं असतात ती तोडली तर घरबांधणीसाठी, फर्निचरसाठी आपल्यालाच उपयोगी पडतात का नाही? ती तोडायला लायसन्स मिळतं ऑफिशिअली. उत्पन्न मिळतं त्यातनं सरकारला! वाळलेलं झाड तर पूर्ण मेलेलं असतं हे लक्षात घ्या!
शिवा : असं कसं? वाळक्या झाडातपण पक्षी घरटी करत्यात, किडामुंगी,वाळवी आपलं संसार थाटत्यात... अन् पार त्या झाडाचा अगदी भुगा झाला तरी त्यापास्नं माती तयार व्हती का न्हाय शेवटी?
शर्वरी : अगदी बरोबर काका! डेड वूड इज नॉट डेड!
शिवा : म्हजी ग काय पोरी?
शर्वरी : तुमचं बरोबर आहे, झाड कधी मरत नाही!
शिवा : आम्ही अडाणी माणसं!
शर्वरी : अडाणीबिडाणी काही नाही हो तुम्ही, पण आम्ही इथं आता उपाशी मरणार त्याचं काय?

शिवा : उपाशी कशापाय? झुणका-भाकर चालंल का?
शर्वरी : झुणका-भाकर? अहो चालेल काय ऐकूनच तोंडाला पाणी सुटलं. आणलीय का? काढा पटकन!
शिवा : ('दम धरा जरा' असं म्हणत बाजूला जाऊन एका झाडाची दोन पानं काढून आणतो त्यांच्या हातात देत) घ्या, पळसाच्या पानावर जेवलाय का कधी?
विक्रम : पळसाला पानं तीनच, या म्हणी पलीकडे या झाडाशी संबंध नाही आला कधी! (शर्वरी उकळी फुटल्यागत हसते)
शिवा : (बोचकं सोडतो. झुणका-भाकर, ठेचा काढून देत) घ्या, खा तुम्ही, तवर धाकल्या पाणवठ्यावरनं पाणी भरून आणतो म्या, द्या ती बाटली हिकडं! ( बाटली घेऊन जातो)
विक्रम : आयला, हा म्हातारा चमत्कारिक दिसतोय अगदी.
शर्वरी : हो ना,पळसाची पानं काय, नाचणीची भाकर काय, झुणका, ठेचा...(मिटक्या मारत खाऊ लागते) आणि टेस्ट बघ काय 'यमी' आहे ती! वा, क्या बात है!
(विक्रम : (एक घास घेत) टेस्ट यम्मी आहे खरी पण माझ्या डोळ्यातनं पाणी काढतोय हा ठेचा...अयाईऽऽऽगं…
शर्वरी : सावकाश, सावकाश!
विक्रम : (तिखट लागलं म्हणून 'हाऽऽऽ' करतो.) तू काही म्हण पण पिझ्झा-बर्गरची सर नाही या झुणका भाकरीला!
शर्वरी : आयत्यावेळी एवढं चांगलं अन्न मिळालं हे कमी आहे का? आणि अशा पद्धतीनं, निसर्गाच्या सान्निध्यात लंच होईल अशी कल्पना तरी केली होतीस का तू कधी?
विक्रम : किती रोमँटिक होतेस ग तू प्रत्येकवेळी?
शर्वरी : म्हणजे? कसं वागावं मी असं वाटतं तुला?
विक्रम : माणसांनं नेहमी सेन्टर्ड राहावं…फोकस्ड…आपलं मिशन विसरू नये इतकंच!
शर्वरी : (त्याला हवं ते उमजून) आलं लक्षात… मूड कसा होता हॅरीचा? मघाशी फोन आला तेव्हा?
विक्रम : कसला मूड घेऊन बसलीस, शेवटची वॉर्निंग दिलीय त्यानं!
शर्वरी : पण मी तरी काय करणार? अशा परिस्थितीत बाबांना एकटं सोडून नाही येऊ शकत मी तिकडं.
विक्रम : मग आपण त्यांनाच तिकडं घेऊन जाऊ!
शर्वरी : काय व्हायचं ते इथंच होऊ दे असं म्हणतायंत ते!
विक्रम : नीट विचार करून सांग. भावनेच्या भरात बोलू नको. छान लग्न होईल... गाडी, बंगला,पैसा, प्रमोशन... मुलं चांगल्या शाळेत जातील, जगाची नागरिक होतील… कशाची म्हणून ददात राहणार नाही!
शर्वरी : (गप्प)
विक्रम : उद्या सकाळपर्यंत कळवायचाय निर्णय…
शिवा : (येतो. त्यानं पाण्याची बाटली भरून आणलेली.
सोबत एक काठी.) हे घ्या पाणी! ( विक्रम बाटली ओढून घेत पाणी पितो) ही काठी सावरीसाठी. पुढचा मार्ग अवघड हाय जरा, तिकडं उपेगी पडंल तुला... झालं ना खाऊन? उठा आता... लांबचा पल्ला हाय आजून.
(दोघेही 'हो चला चला' म्हणत निघण्याच्या तयारीत. तोच खालून पोवाड्याच्या ओळी ऐकू येतात…
शिवबाचे आगळे तेज, स्वप्नात शत्रूच्या रोज,
जाऊनी उतरवी माज, राखितो राज,
दादा रं जीरं दाजी रं जी जी जी ...
जय भवानी! जय शिवराय!
पाठोपाठ बाजीराव ऊर्फ बाज्या महाले खालून उडी मारून वर येतो. वय सत्तर. भरघोस छपरी मिशा. हातात काठी, मनगटावर कडे, कोपरी, मुंडासे. धोतर. घोंगडीची खोळ. काठीला एक गाठोडे बांधलेले.)
बाज्या : रामराम शिवा!
शिवा : रामराम बाज्यादा!
बाज्या : कुठं गडावर चाललाय जणू?
शिवा : व्हय.
बाज्या : गंगी दिसली का रं कुठं?
शिवा : ही काय अशी गेली आताच वर.

बाज्या : च्यामारी!
शिवा : पाणवठ्यावर गेलोतो तर तुरूतुरू पळत जाताना दिसली वर.
बाज्या : जरा बिडीचा झुरका माराय थांबलू तं पळाली म्होरं. रोजची कटकट हाय. कशी संभाळावी काय समजना गड्या! (त्या दोघांना पाहून) पाव्हणं कुठलं म्हणायचं?
शर्वरी : मुंबई! मुळचे इकडचेच पण आता राहतो मुंबईत.
विक्रम : स्टॅमिना पॉवरफुल दिसतोय आजोबा तुमचा, दमायला नाही होत का?
बाज्या : जुनं हाड हाय आमचं… आन आम्ही काय पिझ्झा, बर्गर खाणारे लोक न्हाय तुमच्यासारखे!
शर्वरी : अय्या, तुम्हाला कसं माहीत?
बाज्या : ते सांगाय कशाला हवं, दिसत न्हाय व्हय? (काठीच्या गाठोड्यातून पुडकं काढून देत) हे घ्या!
विक्रम : काय?
बाज्या : पार्सल तुमचं. खाली फटफटीला अडकवलेलं दिसलं, घ्या! तुमचं शेहरातल्या माणसांचं ध्यान कुठं आसतंय नेमकं कळत नाही गड्या! सोताच्या वस्तू नीट संभाळता येत नाहीत तुमाला!
शर्वरी : ओ ग्रेट, कसे आभार मानावे तुमचे कळत नाही.
बाज्या : (तारेत) होता जीवा म्हणून वाचला शिवा…
शर्वरी : ऑं?
बाज्या : (तारेतच आवेशात) नायतं एकाच घावात सय्यदबंडा खांडोळी करणार होता म्हाराजांची. (विक्रम-शर्वरी पहातच आहेत) आन् तसं झालं अस्तं तं समदा इतिहास बदलून गेला असता आपला. (दोघांनाही ते मनोमन पटलेलं) पर एवढं असून शिवाजीच्या बाजूला जीवाचा पुतळा हाय का कुठं, सांगा तुमी!
(दोघेही निरुत्तर)
बाज्या : शिवा काशीदचा पुतळा हाय का कुठं सांगा तुमी?
(दोघेही निरुत्तर)
बाज्या : हिरोजी फर्जंदचा पुतळा हाय का कुठं सांगा तुमी?
(दोघेही निरुत्तर).
बाज्या : अडीनडीला उपेगी पडणाऱ्या गोरगरीब माणसाची काहीच कदर नाही नव्या पिढीला. (तारेतच गाऊ लागतो.)
शिवबाचे आगळे तेज, स्वप्नात शत्रूच्या रोज,
जाऊनी उतरवी माज, राखितो राज,
रक्त सळसळे ,भरे कापरे,
शिवबाच्या पराकरमानं पृथ्वी हादरे
दादा रं जी रं दाजी रं जी जी जी ...
जय भवानी, जय शिवराय…
जीवा महालाचा पुतळा… झाऽऽऽलाच पाहिजे.
हर हर महादेव,
छत्रपती शिवाजी महाराज की ऽऽऽ जय! जीवा महालाचा पुतळा झालाच पाहिजे! गंगे, ए गंगे ऽऽऽ अगं कुठं गेली मस्नी टाकून एकल्याला! (असं म्हणत रंगमंचाच्या दुसऱ्या टोकाला जात तिथे वरच्या दिशेने उडी मारत निघून जातो. काही क्षण शांतता.)
शिवा : (या दोघांना) डोक्यावर परिणाम झालाय त्याच्या. याचा मोठा मुलगा खंडोजी ह्या डोंगर-कपारीत कायम फिरायचा. पशु-पक्ष्यांचा अभ्यास करायचा. गडभ्रमंती करणाऱ्या पोरांना चढाईतले डावपेच शिकवायचा. एकदा मधाचं पोळं काढायला म्हणून गेला वर, तिथनं खाली उतरताना पाय घसरून जो नाहिसा झाला तो परत कुणाला दिसलाच न्हाय. कोण म्हणतं काळ-ढवात बुडाला, कोण म्हणतं वाघानं न्हेला… पण बॉडी काय आजवर सापडली नाय त्याची. तवाधरनं म्हातारीपण खुळी झालीय. तीस- चाळीस वर्सं झाली असतील पन शोध काय थांबला नाय त्यांचा अजून.
विक्रम : अरे बापरे!

शिवा : त्यात सरकारनं जमीन घेतली त्यांची धरणासाठी आन् समदा इस्कोटच झाला!...भुतानं झपाटल्यागत रोज फिरत असतात बिच्यारे गडावर…
शर्वरी : सो सॅड!
शिवा : मुलगी व्हती काशी नावाची. ती बाळतपणात गेली, पोर पण वाचलं न्हाय तिचं...
विक्रम : अरेरे, फार मोठी ट्रॅजेडी झाली हो.
शिवा : पर स्वतःचं दुःख इसरून शिवाजी महाराजांच्या बाजूला जीवा महालाचा पुतळा उभारावा आसं रातदिस वरडत फिरत असतोय त्यो… ऐकून घेयाला येळ हाय कुणाला हितं? 'शिवाजी कुणाचा...' हे ठरवण्यातच सगळी शक्ती जात चाललीय आपली!
शर्वरी : खरं बोललात अगदी! सगळ्याच क्षेत्रात तसं झालंय.. नुसती जीवघेणी धावपळ, आंधळी स्पर्धा,भाकड चर्चा… सगळं आभासी-ऑनलाईन जगणं… कशासाठी? कुठं चाललोय आपण?
विक्रम : (टाळ्या वाजवत) चला, की थांबायचंय इथंच तुमचं भाषण ऐकत?
शिवा : चला चला निघूया, लय चढाई बाकी हाय अजून.
शर्वरी : तुम्ही काहीतरी गंमत सांगणार होता ना काका?
शिवा : ती अजून वर गेल्यावर… पाऊस आला तर फजिती व्हईल आपली... हितनं अर्धा तास चाललं की कारवीचा माळ लागतो, कारवी बघायची हाय ना तुला?
शर्वरी : अय्या हो, चला, कधी एकदा बघीनसं झालंय...
शिवा : हो पण डोळे उघडे ठेवून चालायचं!
शर्वरी : म्हणजे लक्षात नाही आलं.
शिवा : इथं पावलोपावली पदरात पडत असतं काहीतरी.
शर्वरी : खरंय ते एका अर्थी!
शिवा : तिकडं समोरच्या डोंगरावरवर बघा की जरा…
विक्रम : काय, काय?
शिवा : या हिकडं, (तो त्यांना दुसऱ्या कोपऱ्यात घेऊन जातो, तेथून दाखवत) ते बघा, दिसला त्यो डोंगुर? त्यावरची ती ढगाची सावली? दिसली? वरचं भरलेलं आभाळ? दिसलं? आन् इकडं म्होरच्या अंगाला पडणारा पाऊस? दिसला?
शर्वरी : अय्या हो खरंच की! व्वाव!
विक्रम : (दुर्बिणीतून पहात) वा क्या बात है! इकडच्या बाजूनं सूर्यकिरणसुद्धा मिसळलेत त्यात.
शर्वरी : आणि इंद्रधनुष्य कसं पडलंय बघ,ओ माय माय!
विक्रम : बघू बघू.
शर्वरी : दिसलं का?
विक्रम : अरे हो, खरंच की!
शर्वरी :(टाळ्या वाजवत) ओ, वाव्व! (प्रसन्न संगीत) काका, यू हॅव मेड अवर डे!
शिवा : म्हजी काय म्हणतीस ग पोरी? मराठीत बोल की!
शर्वरी : (समोर पहात) असं देहभान हरपून टाकायला लावणारं दृश्य किती दिवसात दिसलं नव्हतं! (शिवा खुशीचं स्मित देत आहे. संगीत सुरूच.आता ते इंद्रधनुष्य मागच्या पडद्यावर अवतरतं, तेथून रंगमंचावर आणि हळूहळू प्रेक्षागृहात फिरू लागतं. रिमझिम पावसाचा भास निर्माण करणारं संगीत.ते वाढत जातं... हळूहळू अंधार.)

अंक पहिला / प्रवेश तिसरा

(प्रकाश. किल्ल्यावरील अधिक उंचावरचा टप्पा. एकीकडे एक लेणीवजा गुहा. गुहेच्या तोंडावर लोंबणाऱ्या पारंब्या, झाडांची उघडी मुळे, गवत. दुसरीकडे वर उंच गेलेले एक झाड. फक्त त्याची डोंगराला धरून असणारी उघडी मुळे रंगमंचावर दिसत आहेत. समोरून चिंचोळी पायवाट. वाटेच्या मागेपुढे थोडी मोकळी जागा. प्रेक्षकांच्या बाजूला खोल दरी. मागील आकाश आता अधिक दिसत आहे. डाऊन-स्टेजला झाडांचे दोन-तीन शेंडे दिसत आहेत. उंचीचा भास निर्माण करण्यासाठी त्याची मदत होते. अंधारून येते, वारा सुटतो. विजांचा कडकडाट. पावसाची हलकी सर.

एका बाजूने खालून शिवा, शर्वरी-विक्रम वर येतात. आडोसा पाहून थांबतात. विक्रम-शर्वरी विंडचीटर तर शिवा घोंगडी झटकत झाडाच्या बाजूला ठेवतात.)
शर्वरी : बापरे, काय खरं दिसत नाही या पावसाचं!
विक्रम : कुठनं तुझ्या नादाला लागलो असं वाटायला लागलंय आता.
शर्वरी : अरे असं का बोलतोस?
विक्रम : विचार कर! परत जायचं का? चार वेळा घसरून पडलीस इथं पोचेपर्यंत.
शर्वरी : नाही नाही, आय ॲम फाईन. आलोय इतक्या लांब तर जाऊन येऊ वरपर्यंत. नाहीतर कायमची टोचणी लागून राहील मनाला.
शिवा : म्या आधीच बोललो व्हतो, आता उमाईचं दर्शन घेतल्याशिवाय मागं फिरता यायचं नाही!
विक्रम : तेव्हा गांभीर्य लक्षात आलं नाही, उत्साहाच्या भरात हो म्हणून गेलो!
शिवा : पाऊस असाच वाढत गेला तर रात्रपण हिथंच काढावी लागंल!
विक्रम : अरे बापरे,अवघड आहे एकूणच...(शर्वरीला) काय म्हणणं आहे तुझं? अजूनही विचार कर!
शर्वरी : माझा कॉन्फिडन्स घालवू नकोस तू!
शिवा : (धोरणीपणे) तिला कशापाय घाबरवताय तुमी? ती हिरकणीची गोष्ट माहीत हाय ना तुला पोरी?
शर्वरी : (प्रेरित होत,ठामपणे) ठरलं! थांबू आपण!
विक्रम : (तिचा निर्धार पाहून) तू म्हणतेस तर थांबू. बाबांशी फोनवर बोलून घे एकदा म्हणजे झालं. मी पण जरा मेल चेक करतो!
शर्वरी : हो, तेच होतं माझ्या मनात आता.
(संगीत सुरू होते.. शर्वरी फोन लावत आहे, विक्रम लॅपटॉप काढून मेल चेक करत आहे. तोवर शिवा गाठोडे उघडून त्यातून प्लॅस्टिकचं एक मोठं कापड काढतो आणि रंगमंचाच्या डाव्या बाजूला एक तात्पुरता निवारा तयार करू लागतो. धोतर,बंडी, मुंडासे काढून विक्रमकडे देत 'काम नंतर करा, कापडं बदलून घ्या आधी' असं त्याला सांगतो. मग आजूबाजूच्या काट्याकुट्या एकत्र करून शेकोटी पेटवतो. विक्रम जॅकेट, कॅप काढून झाडाच्या एका फांदीला अडकवतो, शिवाने दिलेल्या पंचाने केस पुसतो. डोक्याला मुंडासे कसेबसे गुंडाळतो. तोवर शेकोटी पेटलेली.)
शर्वरी : फोन लागत नाही रे, बॅटरीपण डाऊन होत आलीय.
विक्रम : मलाही नेटवर्क मिळत नाही, थोड्या वेळानं ट्राय करतो परत.
शर्वरी : हं...
शर्वरी : (त्याच्याकडे पाहून हसत) या मुंडाश्यात फार
हॅण्डसम दिसतोयस बरं का तू!
विक्रम : तुझ्या तावडीत सापडलोय तर कर चेष्टा!
शर्वरी : चेष्टा नाही रे,खरंच! आजचा दिवस अगदी वेगळाच उगवायलाय आयुष्यात असं वाटतंय आता...
शिवा : खरं बोललात तुम्ही सावरीताई! नशीब लागतं असा दिवस आविष्यात उगवायला...
विक्रम : म्हणजे?
शिवा : आज भाद्रपद-पौर्णिमा.
शर्वरी : भाद्रपद-पौर्णिमा?
शिवा : तीच गंमत सांगणार होतो मी तुम्हाला. पूर्णचंद्र- दर्शनाचा दिवस हाय आज. नशीब आसलं तर तेही घडलं.
शर्वरी : ओ, ग्रेट!
शिवा : वीस वर्षामागं--- म्हजी बघा, दोनहजार साली असं घडलं होतं येकडाव. आन् यानंतर पुढचा योग तब्बल तीस वर्षांनी, म्हजी बघा दोन हजार पन्नाससाली येणार हाय.
शर्वरी : भाग्यच म्हणायला पाहिजे याला, दुसरं काय?
विक्रम : त्यात कसलं आलंय भाग्य? एक खगोलशास्त्रीय घटना आहे ती!
शर्वरी : अरे पण ती आपल्याला स्वतःच्या डोळ्यांनी सगुण-साकार स्वरूपात बघायला मिळतेय हे महत्त्वाचं नाही का? इतका कसा रे रुक्ष तू? 'लाईफ- टाईम अचिव्हमेंट' ठरू शकते ती आपल्यासाठी! काहीही होवो आता मागं फिरायचं नाही!
विक्रम : खाणंपिणं नाही, कपडे नाहीत. आजारी पडलीस तू तर काय होईल?

शर्वरी : काही आजारी पडत नाही,आणि काही झालंच तर (शिवाकडे पहात) 'काका मला वाचवा'! (हसते)
शिवा : उमाईची इच्छा!आन् ती काय वाईट-वंगाळ व्हऊ देणार न्हाय पोरी!
(खालून गंगीचा आवाज येतो…)
गंगी : कोण हाय का रं बाबानू वर? काळोख दाटून आला येकायेकी, पावसानं पण धार धरलीय सारखी. (खालून डोकं वर काढत) कोण, शिवा तू व्हय? बरं झालं, देव पावला म्हणायचं... (गंगी- वय ६५, गुडघ्यापर्यंत लुगडं, खणाची चोळी, नथ, मोठं कुंकू. मोलमजुरी करून जगणारी निरक्षर पण बाणेदार बाई! तिला खूप लोकगीतं येतात. औषधी वनस्पतींचं चांगलं ज्ञान. पर्यटकांना पिठलं-भाकरी, दही, तूप, ताक, खवा इ. पुरवते.)
शिवा : (शिवा तिला खेचून वर घेत) जरा सांभाळून बरं का म्हतारे, घसरलीस तर पार तळाशी जाशील. हाडपण गावायचं न्हाय.
गंगी : (घोंगडी झटकत) तू नग शिकवू मस्नी, रोजची वाट हाय माझी.
शिवा : मग आज कशी काय गळपटलीस ग तू?
गंगी : गळपटतीय कशानं, हा पाऊस आला झड्या मधीच. त्यात त्या म्हताऱ्यानं टकुरं फिरवलं माझं.
शिवा : त्यो कशापाय फिरवतोय? उलट त्योच तिकडं येडा झालाय तुला शोधता शोधता!
गंगी : (चिडत) त्याला माहीत नाय का मी गडावर हाय ती? आठादिशी उमाईची वटी भरायचा नेम हाय माझा!
शिवा : आगं पर त्याला सोडून म्होरं का पळत आलीस तू?
गंगी : म्हतारं दमतंय म्हनून माकडखिंडीची वाट धरली पण हा गेला येड्याधोंडीच्या अंगानं वर...
शिवा : सोबतीनंच वर जावं का न्हाय माणसानं?
गंगी : (हात जोडत) उमाईची किरपा! ती बघतीय काय ते!
शिवा : एवढी कशापाय शेवा करतीस ग तिची?
गंगी : आज ना उद्या भेटंल बाळ, इश्वास हाय माझा.
शिवा : हां, पर इतकी वर्ष झाली आता ...
गंगी : (आता तिला विक्रम प्रथमच दिसतो. संगीत. ती त्याला आपला मुलगा समजून भ्रमिष्टागत त्याच्याशी बोलू लागते.) अगंबाय, आलास तू खंडूबाळा? कुठं व्हतास इतकं दिस आई-बाला टाकून? सोभतं का रं हे तुझ्यासारख्या मुलाला? आरं र रं, पार रया गेली रं तुझी,काय खातपीत व्हतास का न्हाय रं बाबा?
शिवा : अग खंडोजी न्हाय त्यो, फिराया आल्याती पोरं ती! विक्रम नाव हाय त्याचं.
गंगी : न्हाय न्हाय, हा खंडूच हाय माझा. तू फशिवतुयास मस्नी... ( विक्रमजवळ जाऊन बळेबळे त्याची अलाबला काढत) कुठं व्हतास रं बाळा इतकी वर्ष? आन आमाला सोडून राहिलास तरी कसा म्हणावं तू? आता अजाबात सोडून जायाचं न्हाय बरं का? (शर्वरीकडे पहात) आन् ही कोन बया? लगीनपण केलंस का काय?
विक्रम : अहो काय चाललंय तुमचं हे मावशी?...ओ शिट्!
शिवा : (चिडत) अग खंडू न्हाय त्यो, सांगीटलं न्हाय का येकडाव? सुद्धीवर ये गंगे,खंडू ह्या जगात ऱ्हायला न्हाय आता, शाणी व्हय! (गंगी डोळ्याला पदर लावून 'अरं माझ्या बाळा, कवा भेटशील रं मस्नी? असा कसा सोडून गेलास आपल्या आई-बाला?' म्हणत रडू लागते. शर्वरी तिच्या पाठीवर हात ठेवून तिला धीर देत शांत करत आहे. एकदम कुत्र्याच्या भुंकण्याचा आवाज)
शिवा : अरं, हा तर वाघ्याचा आवाज! आला का काय हा शोधत मागोमाग?
(शिवा धावत विंगेजवळ जातो, स्टेजवर दिसेल न दिसेल अशा पद्धतीने अंगावर उडी मारणाऱ्या वाघ्याला-)
शिवा : अरे हो हो, किती जीव लावशील, मी काय कुठं लांब गेलो नव्हतो पळून. सकाळीच तर भेटलो व्हतो की आपण. (विक्रम- शर्वरीला उद्देशून) तुम्ही काही म्हणा पण मुक्या प्राण्याची सर नाय माणसाला. आपल्या काळजीनं वर आला बघा तो! (वाघ्या कू कू करत शिवाला विंगेत आत ओढत आहे.) आर हो हो, काय झालं, काय झालं? बस तिथं, बस गपचीप, बस म्हनतो ना? (विंगेत बघतो तर पार्वती) आरं तिच्या, हिला घेऊन आलास व्हय?
शर्वरी : कोण आलंय?
शिवा : दुसरं कोण, पारी माझी. (संगीत. पार्वती येते. वय ५५ वर्षे. तरतरीत, बुद्धिमान! नऊवार साडी,खणाची चोळी, डोक्यावर एक मोठं गाठोडं, हातातही पिशवी. तिच्याकडचं सामान घेत)
शिवा : अग खुळी झालीस का तू पारे, कशापाय आलीस जीव धोक्यात घालून?

पार्वती : कशापाय म्हजी? जिथं माझा शिवा, तिथं पारू! (हसते) तुमी वर आलाय हे कळलं, मग जे सापडलं ते सामान घेऊन निघाल्ये वर. पाऊस इतका भरून आलाय की आता इथनं हलता पण यायचं नाय आपल्याला.
शिवा : (ओळख करून देत) पोरानू, ही माझी पारी...
शर्वरी/विक्रम : नमस्ते काकी!
शिवा : हा विक्रम, आन् ही सावरी!
पार्वती : नमस्ते, नमस्ते! (शर्वरीला) किती भिजलीस गं पोरी? अशानं आजारी पडशील ना, थांब. कापडं देती म्या तुला बदलाया.( गाठोड्यातून एक जुनाट लुगडं-चोळी काढून देत) जा, बदल तिकडं आडोशाला जाऊन... शर्वरी आडोशाला जाते. पार्वती गाठोड्यातून फोल्डिंगचा टेन्ट काढून शिवाला देत) हा घ्या, लावा तिकडं...
शिवा : वा, हे मातर लयी झ्याक केलंस तू.
विक्रम : चॅयला, टेन्ट? विश्वास बसत नाही माझा काकी!
पार्वती : इतकी वर्ष झाली, अंदाज असतो आमाला कधी काय उपेगी पडंल त्याचा!
(शिवा, विक्रम उजवीकडे टेन्ट लावू लागतात. पार्वती बोचक्यातील खाण्यापिण्याचे सामान, तांब्या-पेला, पातेले, डबे इ. बाहेर काढते, तोवर शिवा या दोघांना तिच्याविषयी अधिक माहिती देत आहे.)
शिवा : गावात सुईणीचं काम करती ही. हाताला गुण असा हाय की उभ्या पंचक्रोशीत एखादी बाई अडली कुठं तर डाक्टरपण बोलवून घेत्यात तिला.
विक्रम : वाह, क्या बात है!
शिवा : झाडपाला आणि ओषधी वनस्पतींची इत्की म्हायती हाय तिला की लांबलांबनं लोक येत्यात औषधपाण्यासाठी.
पार्वती : मला काय कळतंय त्यातलं? (गंगीकडे बोट करत) ही आमची गुरु! हिनंच शिकवलं मला समदं... गंगे, जरा पिठलं गरम करायला घे बरं ! (गंगी त्या कामाला लागते. तोवर शर्वरी कपडे बदलून आलेली. ओले कपडे शेकोटीच्या आजुबाजूला वाळत घालते.)
शर्वरी : (सॅकमधून 'ते' पार्सल काढत) यात पिझ्झा आहे, बर्गर आहे, सॅन्डविचपण आहे. एव्हाना पिठलं झालं असेल त्याचं पण गरम करून बघू.
(पार्वती पार्सल घेते, त्यातील सारे पदार्थ बाहेर काढून गरम करू लागते. रात्र वाढलेली. रातकिड्यांची किरकिर. खालून एकदम बाज्याचा आवाज येतो)
बाज्या : गंगे ऽऽऽ, ए गंगे ऽऽऽ अगं कुठं गेली मस्नी टाकून?
गंगी : अगंबाय, म्हतारं आलं वाटतं. (शिवाला) शिव्या, जरा वर घे रं त्याला!
शिवा : (हात देऊन वर घेत) बरं झालं हातीपायी धड आलास, न्हायतं वाघरानं फडशा पाडला असता एखाद्या!
बाज्या : (गंगीवर राग काढत) खुळी झाली का काय तू म्हातारे, कशापाय जीव घेती माझा? एक झुरका घेतुया बिडीचा तवर थांबता येत न्हाय व्हय तुला?
गंगी : मस्नी नका शिकवू...म्हनलं ना तुमाला घरीच थांबा म्हणून? झेपत न्हाय तं पडायचं कशाला घराबाहीर?
बाज्या : आता हिच्या बायलीला!
गंगी : श्या नका दिऊ!
भाज्या : श्या नाय दिऊ तं काय करू?
पार्वती : कशापाय भांडताय बाज्यादा? या हिकडं, हातपाय शेका, गार पडला असाल...
बाज्या : (संभ्रमित) च्यामारी काय चकवा पडला कळंना…
शिवा : काय झालं रं?
बाज्या : आर तासभर गेला पर फिरून फिरून तिथंच! फिरून फिरून तिथंच!
शिवा : भुताटकी झाली असंल कायतरी.
बाज्या : भुताखेतावर इश्वास न्हाय माझा.
गंगी : (उस्फूर्तपणे) उलट ह्याला बघून भुतंच पळून जातात समदी गावाबाहीर. (सारे हसतात. वातावरण खेळीमेळीचं)
शिवा : (गंगीला) ए म्हातारे, गाणं म्हण की एखादं.
शर्वरी : हो हो म्हणा की!

विक्रम : वा, म्हणा ना, मजा येईल अगदी. (सगळ्यांचा आग्रह… ती हो ना करत तयार होते.)
गंगी : म्या गाणं म्हणती पर तुमी नाचायचं, हाय का कबूल?
(सर्वजण उत्साहात 'हो हो' करतात. पार्श्वभूमीवर ढोल वाजू लागतो. छान साजेसे गाणे सुरू होते. शेकोटीभोवती सारे लयीत नाचू लागतात. ढोलाचा आणि संगीताचा आवाज टिपेला जातो. अंधार.हळूहळू पडदा.)

मध्यंतर.

(नाटकाची पूर्ण संहिता वाचण्यासाठी वर दिलेल्या पत्त्यावर संपर्क साधावा!)